I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S. (पोलीस ठाणे):** सातारा शहर **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0920 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 07/11/2025 06:10 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्हयाची घटना):**

1 **Day (दिवस):** गुरूवार **Date from (दिनांक पासून):** 06/11/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 06/11/2025

**Time Period (कालावधी):** प्रहर ५ **Time From (वेळेपासून):** 14:52 तास **Time To (वेळेपर्यंत):** 14:52 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 07/11/2025 **Time (वेळ):** 05:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 009 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 07/11/2025 06:09 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 2 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** आंबेडकर भवन, सातारा, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भट, जमाती विकास महामंडळ कार्यालय, ,सातारा येथे

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍वेषणफॉर्म - १)

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुप्रिया सुभाष गावडे

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1992

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, साता, सातारा शहर, सातारा, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, साता, सातारा शहर, सातारा, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7758082005

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| **S. No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address(वर्तमान (पत्ता))** |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रदीप सर्जेराव सावंत | | | 1. वसंतराव नाईक विमुक्त जाती,व भटक्या जमाती विकास महामंडळ,Town/Village (शहर / गाव): कार्यालय सातारा,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): सातारा शहर,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S. No. (अ.क्र.)** | **Propertty Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (विवरण)** | **Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

खबरी जबाब दिनांक 07/11/2025

मी सुप्रिया सुभाष गावडे वय- 33 वर्षे, पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा

मो.नं.7758082005.
समक्ष सातारा शहर पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देते की, मी दिनांक 03/11/2025 रोजी अँन्टी करप्शन ब्यूरो, सातारा कार्यालयात हजर असताना, मला पोलीस उप अधीक्षक राजेश वाघमारे यांनी 14.30 वाजता त्यांचे कक्षात बोलावुन घेवून समक्ष हजर असले तक्रारदार श्रीमती दिपाली विकास जाधव वय-39 वर्षे, जात- हिंदू रामोशी, व्यवसाय - गृहिणी, रा. भाटमवाडी पो.चिमणगाव ता.कोरेगाव जि.सातारा यांची ओळख करून देवून, त्यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगुन, त्यांचे तक्रारीवर कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करून घेवुन पुढील कारवाई करणेबाबतचा आम्हास मुखशील आदेश दिला, तसेच पोहवा/1069 गोगावले, पोहवा/546 ताटे, पोकॉ/2026 कणसे शासकिय वाहन बोलेरो एम.एच.11 डीएच 8213 हे मदत कामी दिले असल्याचे सांगितले. त्यानंतर मी लागलीच उपवनसंरक्षक, प्रादेशिक कार्यालय, सातारा यांचे कार्यालयातून लेखी रिपोर्टने एक महिला कर्मचारी व एक पुरुष कर्मचारी यांची मागणी करून दोन शासकीय पंच बोलावून घेतले. त्यानुसार दि.03/11/2025 रोजी 16.30 वाजता दोन पंच एसीबी कार्यालय, सातारा येथे हजर झाले सदरवेळी श्रीमती भारती तुकाराम हिले, लिपिक, उपवनसंरक्षक, वनविभाग, सातारा श्री. गोविंद सुखदेव नाईकनवरे, लिपिक, उपवनसंरक्षक, वनविभाग, सातारा यांची व तक्रारदार जाधव यांची ऐकमेकांना ओळख करून दिली. तसेच सापळा पथक यांचेशी ओळख करून दिली. त्यानंतर मी पंच साक्षीदार यांना तक्रारदार श्रीमती दिपाली विकास जाधव यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आहे त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून श्रीमती भारती तुकाराम हिले, पंच क्र.2 म्हणून श्री. गोविंद सुखदेव नाईकनवरे हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांना त्यांची तक्रारी बाबत विचारणा करता प्रथम त्यांनी तोंडी तक्रार कथन केली व नंतर लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे.

तक्रारदार दिपाली विकास जाधव वय-39 वर्षे, जात- हिंदू रामोशी, व्यवसाय - गृहिणी, रा. भाटमवाडी पो.चिमणगाव ता.कोरेगाव जि.सातारा मो.नं 7796271175

"मी वरील ठिकाणची कायमची रहिवाशी असून तेथे माझे कुटुंबासह एकत्रित राहण्यास आहे. आमची वडीलोपार्जीत शेत जमीन करीत आहे. माझे शिक्षण 7 वी पर्यंत झालेले आहे.

मी शासनाच्या योजनेअंतर्गत शेळी पालन व्यवसाय करण्याचे ठरविल्यानंतर दिनांक 30/05/20225 रोजी  वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या योजनेअंतर्गत शेळी पालन व्यवसायासाठी कर्ज मिळणेसाठी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाईन अर्ज दाखल केला. सदर अर्जाचा नंबर 27246 असा आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने पुढील काय कारवाई झाली याबाबत माहिती घेणेसाठी मी वारंवार सातारा येथील आंबेडकर भवन मधील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादीत, सातारा या कार्यालयात प्रदीप सावंत यांची भेट घेत होते. माझ्या ऑनलाईन कर्ज प्रकरणाचे काम हे त्यांचेकडे होते. त्यांना माझ्याकामा बाबत विचारणा केली असता माझे कर्ज प्रकरण हे पुणे येथून मुंबईच्या हेड ऑफिसला गेले आहे. तुमचे प्रकरणाचा एलवाय  अद्याप मंजूर नाही असे म्हणून माझे कर्ज प्रकरण मंजूरीचे काम करण्यास टाळाटाळ करत होते.

**I.I.F.-I (एकीकृत अन्‌ वेषणफॉर्म - १)**

दिनांक 03/11/2025 रोजी सकाळी 11.00 वाचे सुमारास मी माझे शेळी पालन व्यवसायासाठीचे कर्ज प्रकरणाचा एलवाय मंजूर झाला आहे का याबाबत माहिती घेणेसाठी आंबेडकर भवन मधील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादीत, सातारा या कार्यालयातील प्रदीप सावंत यांची भेट घेतली असता ते माझ्या ऑनलाईन अर्जाचे स्टेटस पाहून माझे प्रकरण हे मुंबई येथे आहे. तेथून प्रकरण मंजूर करून घेणेसाठी 1500/- रु खर्च येणार आहे. तुम्ही माझ्याकडे 1500/- रु दिल्यास मी तात्काळ तुमचे प्रकरण मंजूर करून देतो असे म्हणाले. त्यांना पैसे दिले नाहीत तर ते माझे काम करणार नाहीत असे वाटल्याने मी त्यांना हो म्हणून तेथून आले. त्यावेळी ते मागणी करीत असलेले 1500/- रु रक्कम ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली आहे. मला त्यांना लाच देण्याची अजिबात इच्छा नाही.

आज दिनांक 03/11/2025 रोजी मी 16.30 वा. माझे शेळी पालन व्यवसायाच्या कर्जाच्या प्रकरणाबाबत सातारा येथील आंबेडकर भवन मधील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ या कार्यालयात प्रदीप सावंत यांची भेट घेवून माझे कामाबाबत चर्चा करणार आहे. त्यामध्ये त्यांनी लाच मागणी केल्यास त्यांचेवर आपले विभागामार्फत कायदेशीर कारवाई करावी ही विनंती." वगैरे मजकूरची तक्रार तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिली नंतर सदरची तक्रार मी व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सह्या केल्या.

त्यानंतर मी तक्रारदार श्रीमती जाधव यांचेकडे लोकसेवक प्रदीप सावंत हे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले.पडताळणीसाठी पंच नंबर 1 श्रीमती भारती तुकाराम हिले, पंच नंबर 2 श्री. गोविंद सुखदेव नाईकनवरे हे काम पाहतील असे ठरविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार श्रीमती जाधव यांना लोकसेवक प्रदीप सावंत, आंबेडकर भवन, सातारा येथील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई कार्यालय यांचेकडे लाच मागणी पडताळणी कामी पाठवण्याचे ठरले. त्यानंतर मी उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व त्यानंतर मी आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये MMCARDS कंपनीचे 8 GB कार्ड त्याचे वरील बाजुस MMCARDS micro SD HC 8GB EZASHY0725 BR व खालील बाजुस 09072025 YLY EZASHY0725 BR MADE IN TAIWAN कंपनीचे नवीन मेमरीकार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्याबाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली.त्यानंतर तक्रारदार श्रीमती जाधव व पंच पंच क्र.1 श्रीमती भारती हिले पंच क्र.02 श्री गोविंद नाईकनवरे यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 16.56 वा ची होती. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार श्रीमती जाधव यांनी परिधान केलेल्या ब्लाऊजच्या आतील बाजुस सेफटी पिन च्या सहाय्याने लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्रीमती हिले यांचेसह पडताळणीकामी एसीबी, कार्यालय सातारा येथुन तक्रारदार यांचे नातेवाईक यांनी आणलेल्या मारुती स्विप्ट कार क्रमांक एमएच 11 डीए 9027 मधून आंबेडकर भवन, सातारा येथील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, सातारा कार्यालय येथे रवाना केले. ती वेळ 17.00 वा ची होती. त्यावेळी मी सापळा पथक व पंच क्र. 2 असे एसीबी कार्यालय, सातारा येथे थांबून राहिलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी मी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 17.25 वा.ची होती. त्यानंतर मी पंच क्र.01 श्रीमती हिले यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, तक्रारदार व लोकसेवक सावंत यांची वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, सातारा कार्यालयामध्ये भेट झाली. त्यामध्ये तक्रारदार जाधव यांच्या कामाबाबत चर्चा झाली. सदर चर्चेदरम्यान तक्रारदार या लोकसेवक सावंत यांना त्यांचे कर्ज प्रकरणाच्या अनुषंगाने "आजची काय एलवाय?" असे म्हणाले असता लोकसेवक सावंत हे, "हो आजची, ही काय तारीख तीन आकरा दोन हजार पंचवीस हाय का?" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार या, "सकाळच जरा कन्फ्युजन झालं, किती आकडा म्हणला, काय बोललाय"" असे म्हणाल्या असता लोकसेवक हे, "दीड.. म्हणल दीड" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार या, "देतो.फायनल तेवढंच" असे म्हणाल्या असता लोकसेवक सांवत हे, "हो..दोन अडीच होत्याल त्याज हाय पण ते आता आपण" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार या, "आता देवून गेलं तर नाय चालणार का?" अशा म्हणाल्या असता लोकसेवक सावंत हे, "हां चालतयं की,कस ही तुमच्या ह्यानी माझ नाय काय?"" असे म्हणाले. त्यांची चर्चा झाल्यानंतर मी व तक्रारदार आमचेकडील वाहनाने आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो. वगैरे हकीकत सांगितली. त्यानंतर तक्रारदार श्रीमती जाधव यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता तक्रारदार श्रीमती जाधव यांनी पंच क्र.01 श्रीमती हिले यांचेप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर मी व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकून ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

त्यानंतर मी तक्रारदार श्रीमती जाधव यांना लोकसेवक प्रदीप सावंत यांनी लाच रक्कम कधी व कुठे घेवून येण्यास सांगितले आहे अशी विचारणा करता तक्रारदार श्रीमती जाधव यांनी सांगितले की, लोकसेवक सावंत यांनी लागलीच सहा वाजेपर्यंत पैसे घेवून येण्यास सांगितले आहे.

एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीप्रमाणे लोकसेवक प्रदीप सावंत यांचेकडे दि.03/11/2025 रोजी तक्रारदार यांना पडताळणी कामी पाठवले असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांच्या शासनाच्या वैयक्तिक परतावा योजनेच्या अंतर्गत वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या योजनेच्या लाभाकरिता ऑनलाईन केलेल्या अर्जाची त्यांचे वरिष्ठ कार्यालय, रिझनल मॅनेजर, पुणे यांच्याकडे कर्जाचे एलओआय मंजूरी मिळणेकामी ऑनलाईन पुढे पाठविण्यासाठी लोकसेवक प्रदीप सावंत यांनी दीड.. म्हणलं दीड असे म्हणून तक्रारदार यांचेकडे 1500/- रु लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर मी दोन्ही पंचांना व तक्रारदार श्रीमती जाधव यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सु डिग्री करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार श्रीमती जाधव यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी त्यांचेकडील लाच रक्कम 1500/- रुपये हजर केले. त्यामध्ये 500 रु दराच्या 3 चलनी नोटा होत्या. त्यानंतर पोहवा गोगावले यांनी नमुद नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन काढले. त्यानंतर मी तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले. मी दोन्ही पंचांना पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी

झाल्यास लोकसेवकाची अंगझडती व लाचेची रक्कम जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण नवीन सिलबंद मेमरी कार्ड मोबाईल मध्ये टाकुन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी सापळा पथकाचे मदतीने एसीबी कार्यालयामधील माझ्या केबीनच्या दारे खिडक्या बंद केल्यानंतर कृत्रीम अंधारात दोन्ही पंचांना व तक्रारदार श्रीमती जाधव यांना अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. त्याचे प्रात्यक्षिक पोहवा/1069 गोगावले यांनी करून दाखवले. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेली लाच रक्कम पोहवा/1069 गोगावले यांना अँन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिली असता, पोहवा/1069 गोगावले यांनी कापसाच्या बोळयाने तिन्ही चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस अँन्थ्रासीन पावडर लावली व त्यांनतर पोहवा/1069 गोगावले यांनी सदर लाचेची रक्कम रुपये 1500/- तक्रारदार श्रीमती जाधव यांचेकडील छोट्या कापडी पर्स मध्ये ठेवून ती पर्स तक्रारदार यांच्या हातामध्ये दिली. त्यानंतर पोहवा गोगावले यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले.

त्यानंतर मी पंचांना, तक्रारदार व सापळा पथकातील पोलीस अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या. त्याचवेळी तक्रारदार यांनी लोकसेवक सावंत यांना लाच रक्कम दिल्यानंतर डावा हात डोक्यावरून दोनदा फिरवण्याचा पुर्वनियोजीत इशारा ठरविण्यात आला.

त्यानंतर मी

डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार श्रीमती जाधव त्यानंतर पंच क्र.01 श्रीमजी हिले व पंच क्र.02 नाईकनवरे यांचे सापळा निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ 18.01 वा ची होती.

त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांनी परीधान केलेल्या ब्लाऊजच्या आतील बाजूस सेफ्टी पिनच्या सहाय्याने लाऊन देऊन तक्रारदार यांना पंच क्र.01 श्रीमती हिले यांचे सह 18.05 वा.चे सुमारास त्यांचे नातेवाईक यांनी सोबत आणलेले मारुती स्विप्ट मधून लोकसेवक सावंत यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता आंबेडकर भवन, सातारा येथील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, सातारा कार्यालय येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.02 व सापळा पथक असे सापळा कारवाई कामी लागणा-या आवश्यक साहित्यासह शासकीय वाहनाने तक्रारदार यांचे पाठोपाठ निघालो व आंबेडकर भवन, सातारा येथील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, सातारा कार्यालयाचे पाठीमागील बाजूस वाहन उभे करून कार्यालयाचे आवारात कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबून होतो. तक्रारदार व पंच क्र.01 हे लोकसेवक यांचे कार्यालयात गेले थोडया वेळाने तक्रारदार व पंच हे कार्यालयातुन बाहेर आले व तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहनातुन पुन्हा एसीबी सातारा कार्यालयाचे दिशेने जावु लागले त्यामुळे मी व पंच नंबर 2 व सापळा पथक त्यांचे मागोमाग एसीबी सातारा कार्यालयात परत आलो. तेव्हा मी तक्रारदार श्रीमती जाधव यांचे ब्लाऊजच्या आतील बाजूस लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. ती वेळ 18.25 वा. चे सुमाराची होती. त्यानंतर मी पंच नंबर 1 यांचेकडे समक्ष काय घडले याबाबत विचारणा केली असता, पंच नंबर 1 यांनी सांगितले की, मी  व तक्रारदार असे लोकसेवक सावंत यांचे कार्यालयात गेलो असता सदरचे ऑफिस बंद होते व सदर ठिकाणी कोणीही नव्हते. त्यामुळे लाच रक्कम न देता परत आलो. त्यानंतर तक्रारदार यांना गेले पासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा करता त्यांनी पंच क्र.01

यांचेप्रमाणे वरीलप्रमाणे हकिकत सांगून लाच रक्कम न दिल्यामुळे लाच रक्कमेचा इशारा न करताचा एसीबी कार्यालय, सातारा येथे परत आलो असल्याचे सांगितले.

एकंदरीत 03/11/2025 रोजी केले सापळा कारवाईमध्ये तक्रारदार श्रीमती जाधव या आंबेकडर भवन, सातारा येथील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ कार्यालय येथे गेल्या त्यावेळी कार्यालय बंद झाल्यामुळे लोकसेवक सावंत यांची भेट न झाल्याने सापळा कारवाई स्थगित करण्यात आली. सदर कारवाई मध्ये वापरलेली 1500/- रुपये लाच रक्कम ही एका पाकीटात सिलबंद करून सुरक्षिततेच्या दृष्टीने माझे ताब्यात ठेवली. तसेच सदरची लाच रक्कम ही पुढील सापळा कारवाई वापरण्यात येणार असल्याचे पंचांना व तक्रारदार यांना सांगून दिनांक 04/11/2025 रोजी पुन्हा सापळा कारवाई करण्यात येईल असे आमचे, तक्रारदार व पंचांचे सहमतीने ठरविण्यात आले. त्यानुसार तक्रारदार,पंच व सापळा पथकांस सुचना दिल्या.त्यानंतर पडताळणी व सापळा पंचनामाबाबतचे स्क्रीप्ट व पंचनामा तयार करुन सर्व कार्यवाही एसीबी कार्यालय, सातारा येथे पूर्ण करण्यात आली आहे.

त्यानंतर दिनांक 04/11/2025 रोजी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात माझे केबीनमध्ये गोपनिय कामकाजासाठी 09.30 वा. हजर झाले. त्यांची पुन्हा ऐकमेकांशी ओळख करून दिल्यानंतर मी पंचास व तक्रारदार यांना अँथ्रासिन पावडरची डबी व अल्ट्रा व्हायोलेट दिवा दाखवुन, अँथ्रासिन पावडर याचे गुणधर्म व उपयोग समजावून सांगुन दिनांक 03/11/2025 रोजीचे सापळा कारवाईवेळी सिलबंद लखोट्यातील लाच रक्कम पोहवा गोगावले यांनी बाहेर काढुन पंचासमक्ष खात्री करून घेवून त्यांना सदर 1500/- रुपये लाच रक्कमेच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावण्याची सुचना दिली. त्याप्रमाणे त्यांनी अँथ्रासिन पावडर कापसाच्या बोळयाने नोटांचे दोन्ही बाजुस लावली. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पोहवा/1069 गोगावले यांनी 1500/- रुपये लाच रक्कम तक्रारदार श्रीमती यांचेकडील छोट्या कापडी पर्समध्ये ठेवून ती पर्स तक्रारदार यांचे हातातमध्ये दिली. त्यानंतर पोहवा गोगावले यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले.

मी दोन्ही पंचांना पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची अंगझडती व लाचेची रक्कम जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण नवीन सिलबंद मेमरी कार्ड मोबाईल मध्ये टाकुन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी पंचांना, तक्रारदार श्रीमती जाधव व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर मी सापळा कारवाईवेळी तक्रारदार श्रीमती जाधव व लोकसेवक सावंत यांचेत होणारे संभाषण ध्वनिमुद्रीत करण्यासाठी सोनी कंपनीचा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्यामध्ये पडताळणी व सापळा कारवाईवेळी असलेले मेमरीकार्ड असुन त्यामध्ये पडताळणी कारवाईवेळच्या 02 फाईल्स सेव्ह असुन तेच मेमरीकार्ड पुढे सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणार असल्याचे सांगुन तक्रारदार व पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर मी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार श्रीमती जाधव, पंच नं. 1 हिले, पंच नं. 2 नाईकनवरे यांचे निवेदन ध्वनिमुद्रीत केले. ती वेळ 11.06 वा.चे सुमाराची होती.

त्यानंतर तक्रारदार व पंच नं. 1 हे आंबेकडर भवन, सातारा वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ कार्यालय येथे लोकसेवक सावंत यांना भेटणेसाठी तक्रारदार यांचे नातेवाईक यांचे मारुती स्विप्ट चारचाकी वाहनामधून एसीबी, सातारा या कार्यालयातुन रवाना झाले.

त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. 2 व सापळा पथकातील अंमलदार असे सापळा कामी आवश्यक साहित्यासह खाजगी वाहन मारुती सुझुकी इर्टिगा क्र. एमएच 11 डीए 3177 मधनू आंबेकडर भवन, सातारा येथील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ कार्यालयाचे पाठीमागील बाजूस वाहन उभे करून कोणास संशय येणार नाही अशा रितीने कार्यालयाचे परिसरात सापळा लावुन थांबुन राहिलो.

तक्रारदार व पंच क्र.01 हे लोकसेवक यांचे कार्यालयात गेले व थोडया वेळाने तक्रारदार व पंच नं 1 हे कार्यालयातुन बाहेर आले व तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहनातुन पुन्हा एसीबी सातारा कार्यालयाचे दिशेने जावु लागले त्यामुळे मी व पंच नंबर 2 व सापळा पथक त्यांचे मागोमाग शासकीय वाहनातून एसीबी सातारा कार्यालयात परत आलो. तेव्हा मी तक्रारदार श्रीमती जाधव यांचे ब्लाऊजच्या आतील बाजूस लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. ती वेळ 11.55 वा. चे सुमाराची होती. त्यानंतर मी पंच नंबर 1 यांचेकडे समक्ष काय घडले याबाबत विचारणा केली असता, पंच नंबर 1 हिले यांनी सांगितले की, मी तक्रारदार असे लोकसेवक सावंत यांचे कार्यालयात गेलो असता तक्रारदार व लोकसेवक सावंत यांची त्यांचे कार्यालयामध्ये भेट झाली. तेव्हा तक्रारदार या लोकसेवक सावंत यांना, "पैसे आणलेत की" अशा म्हणाल्या असता, लोकसेवक सावंत हे, "नको पैसे असु द्या" असे म्हणाले, तेव्हा तक्रारदार या, "आता रात्री पण तुम्ही म्हणाला की दया आणुनशनी आणि आता नको म्हणताय" अशा म्हणाल्या असता लोकसेवक सावंत हे, "नको पैसे ओ" असे म्हणाले. त्यानंतर तेथे ऑफिसचे सफाईचे काम चालू असल्यामुळे तक्रारदार या लोकसेवक यांना "तासाभरात येते माघारी, मग सांगा हे झाडपूस झाल्यानंतर" असे म्हणाल्या. त्यादरम्यान तक्रारदार यांचेकडून लोकसेवक सावंत यांनी पैसे स्विकारले नाहीत. त्यामुळे तक्रारदार व मी पुन्हा चारचाकी वाहनाने एसीबी कार्यालयात आलो. वगैरे हकीकत सांगितली.

त्यानंतर तक्रारदार यांना गेले पासून येईपर्यत काय झाले याबाबत विचारणा करता त्यांनी पंच नंबर 1 यांचे हकीकती प्रमाणे हकीकत सांगून लोकसेवक यांनी लाच रक्कम स्विकारली नसल्याने इशारा न करताचा पुन्हा एसीबी कार्यालयात आल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकले असता ते तक्रारदार व पंच नं 1 यांनी सांगितलेल्या हकीकती प्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

सदरवेळी आम्ही तक्रारदार श्रीमती जाधव यांना विचारले असता त्यांनी एक तासात पुन्हा लोकसेवक यांची भेट घेणेसाठी जाणार असल्याचे सांगितले. त्यानंतर सुमारे तासाभरानंतर आम्ही उपस्थित पंच, तक्रारदार व सापळा पथकास पुढील सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो मी तक्रारदार श्रीमती जाधव यांनी परिधान केलेल्या ब्लाऊजच्या आतील बाजूस सेप्टी पिनच्या सहाय्याने लावून चालू करून दिला व तक्रारदार यांना पंच नं 1 हिले यांचेसह लोकसेवक सावंत यांचेकडे लाच रक्कम देणेकामी एसीबी, कार्यालय, सातारा येथून तक्रारदार यांचे नातेवाईक यांचे मारुती स्विफ्ट चारचाकी वाहन मधून आंबेडकर भवन, सातारा येथील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ कार्यालय येथे रवाना केले. ती वेळी 14.35 वा ची होती. त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. 2 व सापळा पथकातील अंमलदार असे सापळा कामी आवश्यक साहित्यासह शासकीय वाहनाने आंबेकडर भवन, सातारा वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ कार्यालयाचे पाठीमागील बाजूस वाहन उभे करून कोणास

संशय येणार नाही अशा रितीने कार्यालयाचे परिसरात सापळा लावुन थांबुन राहिलो.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.01 हे लोकसेवक यांचे कार्यालयात गेले व थोडया वेळाने तक्रारदार व पंच हे कार्यालयातुन बाहेर आले व ते चारचाकी वाहनातुन पुन्हा एसीबी, सातारा कार्यालयाचे दिशेने जावु लागले त्यामुळे मी व पंच नंबर 2 व सापळा पथक त्यांचे मागोमाग शासकीय वाहनातून एसीबी कर्यालय, सातारा येथे परत आलो. तेव्हा मी तक्रारदार श्रीमती जाधव यांचे ब्लाऊजच्या आतील बाजूस लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. ती वेळ 15.31 वा. चे सुमाराची होती. त्यानंतर मी पंच नंबर 1 यांचेकडे समक्ष काय घडले याबाबत विचारणा केली असता, पंच नंबर 1 हिले यांनी सांगितले की, मी तक्रारदार असे लोकसेवक सावंत यांचे कार्यालयात गेलो असता तक्रारदार व लोकसेवक सावंत यांची त्यांचे कार्यालयामध्ये भेट झाली. तक्रारदार यांची त्यांचेशी कामानिमीत्ताने चर्चा झाली. परंतू त्यादरम्यान तक्रारदार यांचेकडून लोकसेवक सावंत यांनी लाच रक्कम स्विकारली नाही. त्यामुळे तक्रारदार व मी पुन्हा चारचाकी वाहनाने एसीबी कार्यालयात आलो. वगैरे हकीकत सांगितली.

त्यानंतर तक्रारदार यांना गेले पासून येईपर्यत काय झाले याबाबत विचारणा करता त्यांनी पंच नंबर 1 यांचे हकीकती प्रमाणे हकीकत सांगून लोकसेवक यांनी लाच रक्कम स्विकारली नसल्याने इशारा न करताचा पुन्हा एसीबी कार्यालयात आल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकले असता ते तक्रारदार व पंच नं 1 यांनी सांगितलेल्या हकीकती प्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत दिनांक 04/11/2025 रोजी केले सापळा कारवाईमध्ये तक्रारदार श्रीमती जाधव या आंबेकडर भवन, सातारा येथील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, कार्यालय सातारा येथे गेल्या असता त्यांची व लोकसेवक सावंत यांची भेट होवून कामाची चर्चा झाली परंतू त्यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम स्विकारली नाही. त्यामुळे लोकसेवक सावंत हे तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम स्विकारणार नाहीत अशी खात्री झाल्याने सापळा कारवाई स्थगित करण्यात आली. सदर कारवाई मध्ये वापरलेली 1500/- रुपये लाच रक्कम ही एका पाकीटात सिलबंद करून सुरक्षिततेच्या दृष्टीने माझे ताब्यात ठेवली. तसेच सदरची लाच रक्कम ही पुढील सापळा कारवाई वापरण्यात येणार असल्याचे पंचांना व तक्रारदार यांना सांगितले. तसेच तक्रारदार यांना लोकसेवक यांनी संपर्क केल्यानंतरच पुन्हा सापळा कारवाई करण्यात येईल असे आमचे, तक्रारदार व पंचांचे सहमतीने ठरविण्यात आले. त्यानुसार तक्रारदार,पंच व सापळा पथकांस सुचना दिल्या.त्यानंतर पडताळणी व सापळा पंचनामाबाबतचे स्क्रीप्ट व पंचनामा तयार करुन सर्व कार्यवाही एसीबी कार्यालय, सातारा येथे पूर्ण करण्यात आली आहे.

त्यानंतर मला दिनांक 06/11/2025 रोजी 11.00 वाचे सुमारास तक्रारदार श्रीमती जाधव यांनी संपर्क करून लोकसेवक प्रदीप सावंत यांनी त्यांचे कार्यालयामध्ये कामासंदर्भाने भेटण्यास बोलविले असल्याचे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांना एसीबी कार्यालय, सातारा येथे येणेबाबत कळविले व याबाबत आमचे वरिष्ठ अधिकारी श्री राजेश वाघमारे, पोलीस उपअधीक्षक, यांना याबाबत कळविल्यानंतर त्यांनी दिले सुचनेप्रमाणे पंचांना संपर्क करून पंचांना तात्काळ कार्यालयात हजर राहणेबाबत कळविण्यात आले. त्यानंतर दोन्ही शासकीय पंच व तक्रारदार हे 13.00 वाचे सुमारास कार्यालयात हजर झाले. त्यांची व कार्यालयात कर्तव्यावर हजर असलेले पोहवा/90 नलवडे,

पोहवा/2028 चव्हाण, मपोना/1906, पोकॉ/2026 कणसे यांची सापळा पथकात नियुक्ती करून त्यांचेशी ऐकमेकांना ओळख करून दिली. दिनांक 03/11/2025 व दिनांक 04/11/2025 रोजीचे पडताळणी व सापळा कारवाई मध्ये पंच नंबर 1 म्हणून काम पाहिलेल्या महिला पंच श्रीमती भारती तुकाराम हिले या वैदयकिय रजेवर असल्याने त्या सापळा कारवाई कामी उपलब्ध नसल्याने त्यांचे ऐवजी उपवनसंरक्षक, प्रादेशिक कार्यालय, सातारा यांचेकडील पुजा माणिक परुळे वय- वर्षे पद-वनसंरक्षक या हजर असल्याचे सांगून सदर सापळा कारवाई कामी त्यांची पंच म्हणून काम करण्याची संमती घेतली. पंच नंबर 1 म्हणून पुजा परुळे व पंच नंबर 2 गोविंद सुखदेव नाईकनवरे हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर मी पंच साक्षीदार यांना दिनांक 03/11/2025 रोजी पडताळणी कारवाई वेळी तक्रारदार श्रीमती दिपाली जाधव यांच्या शासनाच्या वैयक्तिक परतावा योजनेच्या अंतर्गत वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या योजनेच्या लाभाकरिता ऑनलाईन केलेल्या अर्जाची त्यांचे वरिष्ठ कार्यालय, रिझनल मॅनेजर, पुणे यांच्याकडे कर्जाचे एलओआय मंजूरी मिळणेकामी ऑनलाईन अर्ज पुढे पाठविण्यासाठी लोकसेवक प्रदीप सावंत यांनी 1500/- रु लाचेची मागणी केली असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे आज तक्रारदार या लोकसेवक सावंत यांची भेट घेवून त्यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांचे कार्यालयात नेवून देणार असल्याने सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी पंचास व तक्रारदार यांना अँथ्रासिन पावडरची डबी व अल्ट्रा व्हायोलेट दिवा दाखवुन, अँथ्रासिन पावडर याचे गुणधर्म व उपयोग समजावून सांगुन दिनांक 03/11/2025 रोजीचे सापळा कारवाईवेळी सिलबंद लखोट्यातील लाच रक्कम पोकॉ/2026 कणसे यांनी बाहेर काढुन पंचासमक्ष खात्री करून दिल्यानंतर घेवून त्यांना सदर 1500/- रुपये लाच रक्कमेच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावण्याची सुचना दिली. त्याप्रमाणे त्यांनी अँथ्रासिन पावडर कापसाच्या बोळयाने नोटांचे दोन्ही बाजुस लावली. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पोकॉ/2026 कणसे यांनी 1500/- रुपये लाच रक्कम तक्रारदार श्रीमती यांचेकडील छोट्या कापडी पर्समध्ये ठेवून ती पर्स तक्रारदार यांचे हातातमध्ये दिली. त्यानंतर पोकॉ कणसे यांना सापळा पथकातून वगळण्यात आले.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची अंगझडती व लाचेची रक्कम जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण नवीन सिलबंद मेमरी कार्ड मोबाईल मध्ये टाकुन पोहवा/2028 चव्हाण हे करणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी पंचांना, तक्रारदार श्रीमती जाधव व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर मी सापळा कारवाईवेळी तक्रारदार श्रीमती जाधव व लोकसेवक सावंत यांचेत होणारे संभाषण ध्वनिमुद्रीत करण्यासाठी सोनी कंपनीचा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्यामध्ये दिनांक 03/11/2025 व दिनांक 04/11/2025 पडताळणी व सापळा कारवाईवेळी असलेले मेमरीकार्ड असुन त्यामध्ये पडताळणी कारवाईवेळच्या 04 फाईल्स सेव्ह असुन तेच मेमरीकार्ड पुढे सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबत तक्रारदार व पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर मी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार श्रीमती जाधव, पंच नं. 1 परुळे पंच नं. 2 नाईकनवरे यांचे निवेदन ध्वनिमुद्रीत केले. ती वेळ 14.06 वा.चे सुमाराची होती.

त्यानंतर तक्रारदार श्रीमती जाधव व पंच नं. 1 पुजा परुळे हे आंबेकडर भवन, सातारा वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ कार्यालय येथे लोकसेवक सावंत यांना

भेटणेसाठी तक्रारदार यांचे नातेवाईक यांचे मारुती स्विप्ट चारचाकी वाहनामधून एसीबी, सातारा या कार्यालयातुन रवाना झाले. ती वेळ 14.10 वाची होती. त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. 2 व सापळा पथकातील अंमलदार असे सापळा कामी आवश्यक साहित्यासह खाजगी वाहन मारुती ब्रिझा एमएच 11 डीएन 0990 मधून आंबेकडर भवन, सातारा येथील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ कार्यालयाचे पाठीमागील बाजूस वाहन उभे करून कोणास संशय येणार नाही अशा रितीने कार्यालयाचे परिसरात सापळा लावुन थांबुन राहिलो.

तक्रारदार व पंच क्र.01 हे लोकसेवक यांचे कार्यालयात गेले व काही वेळाने तक्रारदार हे कार्यालयातुन बाहेर आल्यानंतर तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्वनियोजित इशारा केला असता आम्ही व सापळा पथक असे वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, सातारा कार्यालय येथे आलो. त्यावेळी आमचे सुचनेवरून मपोना/1906 जाधव यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बदं केला ती वेळ 14.52 वाची होती. त्यानंतर यापूर्वी सुचना दिलेप्रमाणे पोहवा चव्हाण यांनी व्हिडीओ चित्रीकरण सुरु केले. लोकसेवक सावंत हे त्यांचे खुर्चीमध्ये बसलेले असताना पोहवा नलवडे यांनी अटकावून ठेवले. ती वेळ 14.58 वाची होती. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक यांनी लाच रक्कम कुठे ठेवली याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की, मी माझ्याकडील छोटया कापडी पर्समधील अँथ्रासीन पावडर लावलेली 1500/- रु लाच रक्कम पर्समधून उजव्या हाताने काढून सावंत यांचे पुढे धरली असता, त्यांनी ठेवा की तेज्यात फाईल मध्ये असे म्हणून मला लाच रक्कम त्यांचे टेबलवरील लाल रंगाच्या फाईलमध्ये ठेवण्यास सांगितली. सदरची फाईल त्यांचे टेबलवर असल्याचे सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक सावंत यांना पंचासमक्ष लाच रक्कमेबाबत विचारले असता त्यांनी त्यांचे टेबलशेजारी उजव्या बाजुस असलेल्या छोट्या टेबलवर असलेल्या लाल रंगाच्या फाईलमध्ये असल्याचे सांगितले व मी पंच क्र. 2 श्री नाईकनवरे यांना त्यांचे जवळील सापळा पुर्व कारवाई दरम्यानचे नोटांचे नंबर लिहून दिलेल्या कागदावरील नंबर एकच आहेत का? याबाबत खात्री करण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंच नं 2 श्री नाईकनवरे यांनी नोटांचे नंबर हे त्यांचेकडील कागदावर लिहिलेल्या नंबरशी पडताळून पाहिले असता ते तंतोतंत जुळून आले. त्यानंतर लोकसेवक सावंत यांचे ऑफिसमध्ये लाईट बंद करून कृत्रिम अंधारामध्ये लोकसेवक सावंत यांचेकडून हस्तगत केलेली लाच रक्कम व लाल रंगाची फाईल व त्यांचे दोन्ही हातांची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात पंचासमक्ष तपासणी केली असता लोकसेवक सावंत यांचे दोन्ही हातास पुढील बाजूस निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच हस्तगत केलेल्या लाच रक्कम 1500/- रुपयेच्या चलनी नोटांवर व लाल रंगाच्या फाईलचे आतील बाजूस तसेच त्यामधील कागदावरही अँथ्रासीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच पंच नंबर 2 यांचे हातासही अँथ्रासीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली. सदर वेळी नमूद लोकसेवक सावंत यांचे ताब्यातून तक्रारदाराचे त्यांचेकडे प्रलंबित असलेल्या कामाची कागदपत्रे असलेली फाईल हस्तगत करण्यात आली. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी यातील तक्रारदार श्रीमती दिपाली विकास जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. 03/11/2025 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार दिपाली विकास जाधव वय-39 वर्षे, जात- हिंदू रामोशी, व्यवसाय - गृहिणी, रा. भाटमवाडी पो.चिमणगाव ता.कोरेगाव जि.सातारा यांनी शासनाच्या वैयक्तिक परतावा योजनेच्या अंतर्गत वसंतराव नाईक विमुक्त जाती व

भटक्या जमाती विकास महामंडळाच्या योजनेच्या कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गत ऑनलाईन केलेल्या कर्ज प्रकरणाची एलओआय ( LETTER OF INTENT) मंजूरी मिळणेसाठी कागदपत्रे पुढे पाठविण्यासाठी लोकसेवक प्रदीप सर्जेराव सावंत वय-40 वर्षे पद-लिपिक(मानधनी) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, कार्यालय सातारा यांनी पंचासमक्ष 1500/- रु लाचेची मागणी करून ती लाच दिनांक 06/11/2025 रोजी आंबेडकर भवन, सातारा येथील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ कार्यालय, सातारा येथे पंचासमक्ष स्विकारून त्यांनी बेकायदेशीर, अप्रामाणिकपणे आर्थिक गैरफायदा मिळविला म्हणून माझी त्यांचे विरुद्‌ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील खबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखित करण्यात आला असून तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष हा खबरी जबाब दिला.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Rajendra Bapu Maske (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्‌दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Rajendra Bapu Maske

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):**

**14.** **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15.** **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1985 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**